झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in
फोन नं. : २६५६५८००, २६५९०४०५/१८७९
फॅक्स क्र. : ०२२-२६५९०४५७

परिपत्रक क्र. १४३

क्र.झोपुप्रा/उजि/परिपत्रक/१०३२/२०१३
दि. 31 JUL 2013

विषय : महाराष्ट्र झोपडपटटी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ अंतर्गत असहभागी पात्र झोपडीधारकांविरुध्द निष्कासनाची कारवाई करणेबाबत तसेच सुधारित कलम ३३ अ (ड) नुसार अधिकार प्रदान करणे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ अधिनियम मधील कलम ३(ड) मध्ये १९९७ साली सुधारणा करण्यात आल्या होत्या व त्यानुसार कलम ३३ व ३८ नुसार झोपडीधारकांची निष्कासनाची कार्यवाही करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांना प्रदान करण्यात आले होते.

त्यानुसार या प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.९, जा.क्र.झोपुप्रा/अजि/२२२, दि.६.१.१९९८ नुसार उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३३ व ३८ नुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली होती व सदर अधिनियमातील कलम ३३ व ३८ मधील सुधारित तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत या प्राधिकरणातील आदेश क्र. एसआरए/ अजि/ १९४ /१२ /३०९, दि. २४/०१/२००० अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी /झोपुप्रा यांना प्रदान केलेले अधिकार उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा यांना प्रत्यार्पित करण्यात आले होते. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत असहभागी झोपडीधारकांविरुध्द निष्कासनाची कार्यवाहीबाबतचे प्रस्ताव या प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी कक्षामार्फत संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत होते.

*D:\SayaliJ\LA dictetion\paripratrak9.doc*

तथापि उक्त अधिनियमातील सन २०१२ साली नव्याने झालेल्या सुधारणेनुसार कलम ३३ व ३८ नुसारची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी करणेबाबतची तरतूद करण्यात आली आहे.

सबब या प्राधिकरणतील परिपत्रक क्र. ९ जा.क्र. झोपुप्रा/अजि/२२२, दि. ०६/०१/१९९८ व प्रशासकीय आदेश क्र. एसआरए/ अजि/ १९४ /१२ /३०९, दि. २४/०१/२००० रद्द करणेत येत असून सुधारित अधिनियमातील कलम ३३ व ३८ अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत किंवा प्रकल्पात सहभागी होण्यासाठी इच्छुक नसलेल्या पात्र झोपडपट्टी रहिवाश्यांच्या निष्कासनाच्या कार्यवाहीबाबतचे सर्व प्रस्ताव संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था/विकासक यांनी या प्राधिकरणाने विहित केलेल्या नमून्यामध्यें आवश्यक कागदपत्रांसह संबंधित सक्षम प्राधिकारी यांना परस्पर सादर करण्यात यावे.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत,

१. सर्व सक्षम प्राधिकारी
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी / झोपुप्रा यांचे स्विय सहाय्यक
३. सचिव/झोपुप्रा
४. वित्त नियंत्रक/झोपुप्रा
५. उपमुख्य अभियंता/झोपुप्रा
६. उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा
७. सहनिबंधक/झोपुप्रा
८. कार्यकारी अभियंता, शहर/पूर्व/पश्चिम उपनगरे/झोपुप्रा
९. तहसिलदार/प्रशासन/झोपुप्रा
१०. नगर भूमापन अधिकारी/झोपुप्रा
११. सहाय्यक निबंधक/झोपुप्रा
१२. विधी सल्लागार
१३. सहाय्यक संचालक नगर रचना/झोपुप्रा
१४. प्रशासकीय अधिकारी/झोपुप्रा
१५. माहिती तंत्रज्ञान अधिकारी/झोपुप्रा
१६. जनसंपर्क अधिकारी/झोपुप्रा
१७. निवड संचिका

D:\Sayali\LA dictetion\paripratrak9.doc